स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आंतरविद्याशाखेंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) या पदवीसाठी संशोधन करण्यात येणाऱ्या संशोधनाचा आराखडा

संशोधन शीर्षक

'महाराष्ट्रातील पुराभिलेखागाराचे सर्वंकष सर्वेक्षण उपार्जन, व्यवस्थापन, सेवा माहिती साधनांचे जतन व संवर्धनः एक चिकित्सक अभ्यास'

अभ्यासक

श्री. व्यंकट बाबूराव सूर्यवंशी

स्कूल ऑफ मिडिया स्टडीज,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक

डॉ. काटे नामदेव रामकिशन

श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय, लातूर

संशोधन केंद्र

स्कूल ऑफ मिडिया स्टडीज,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'महाराष्ट्रातील पुराभिलेखागाराचे सर्वंकष सर्वेक्षण उपार्जन, व्यवस्थापन, सेवा माहिती साधनांचे जतन व संवर्धनः एक चिकित्सक अभ्यास'

प्रास्ताविक

इतिहासकालिन लिहिलेल्या मजकूराला पुराभिलेख असे म्हणतात. यूरोपमध्ये अशा कागदपत्रांच्या संग्रहास रेकॉर्ड (दप्तर) आणि रेकॉर्ड ऑफिस (दप्तरखाना) असे म्हटले जाते. या दप्तरखान्यास अभिलेखागार या नावान संबोधिले जाते. लेख सुरक्षित ठेवण्याची पद्धती, असुरक्षित लेखांना सुरक्षित करण्याची पद्धती, सुरक्षित ठेवलेले लेख वाचून त्यांचे सारांश काढणे, ते लेख रोजचा कारभार किंवा इतिहास लेखनास उपयोगी पडतील याचा विचार करून त्याप्रमाणे व्यवस्था करणे, या अनेक गोष्टींचा पुराभिलेखविद्या या विषयात समावेश होतो. अशा प्रकारचे काम ज्या ठिकाणी चालते त्याला पुराभिलेखागार किंवा अभिलेखागार असे म्हणतात.

मानवी समाजाचा आजपर्यंतच्या झालेल्या विकासाची माहिती, संस्कृती, संवर्धनाच्या माध्यमातून दस्तऐवज, अभिलेख, पुराभिलेख यांची निर्मिती झालेली आपल्याला दिसते. महाराष्ट्रात पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागा अंतर्गत पुराभिलेख संचालनालय काम करते. या विभागाचे काम प्रादेशिक विभागामार्फत चालते. आजतागायत महाराष्ट्रात पुराभिलेख संचालनालयाकडे १७.५ कोटी दस्तऐवज आहेत. मुंबई पुराभिलेखाची स्थापना १८२१ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात झालेली आहे.

संशोधनाचे महत्त्व

आपल्याकडील ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला उपलब्ध करून देण्यासाठी पुराभिलेखागाराची निर्मिती झालेली दिसते. कलाकृती, दस्तऐवज, पुरातनवस्तू, मुलभूत ज्ञान याची माहिती सर्वसामान्य व्यक्ती, संशोधक व अभ्यासकाला उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पुराभिलेख संशोधनासाठी महत्त्वाचे आहेत. ग्रंथविषयक सामाजिक, राजकीय, प्रशासनिक संशोधनासाठी संदर्भ म्हणून पुराभिलेखागारामधील माहिती आज

तंत्रज्ञानाच्या युगातही महत्त्वाची आहे. माहितीसंग्रह जतन करून पुढच्या पिढीला संस्कृती संवर्धन करण्यासाठी अधिकची मदत होणार आहे. ग्रंथालयाप्रमाणे संशोधकाला संदर्भ साधने पुरविण्याचे काम पुराभिलेख किंवा अभिलेखागार करते. या पुराभिलेख किंवा अभिलेखागारामुळे महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारताबरोबरच जगातील संशोधकाला जुन्या काळातील विषयावरही संशोधन करण्यासाठी संदर्भ साधने उपलब्ध होण्यासाठी मदत होत आहे. म्हणून प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे वाटते.

विषय निवड

महाराष्ट्रातील ग्रंथालयावर वेगवेगळ्या विषयाच्या अनुषंगाने संशोधन झाले आहे. मात्र महाराष्ट्रातील पुराभिलेखागार या विषयावर संशोधन झालेले नाही. माहिती व तंत्रज्ञानाच्या जगात जुने अभिलेख दस्तऐवजांचे संग्रह व जतन करण्याते काम पुराभिलेखागारामार्फत केले जाते. ज्या पध्दतीने ग्रंथालयाकडून सेवा दिल्या जातात अशाच प्रकारच्या संदर्भ सेवा पुराभिलेखागारामार्फत दिल्या जातात. त्याचबरोबर एखाद्या देशाची व राज्याची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती, जीवनव्यवहार, शिक्षण, उद्योग कशा प्रकारे राबविले जात होते याचे पुरावे संदर्भ पुराभिलेखागारातील कागदपत्रावरून आकलन होण्यास व समजून घेण्यास मदत होते. म्हणून शासनाच्या कामकाजामध्ये पुराभिलेख कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावते. यामुळेच पुराभिलेखागारामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधांचे मुल्यमापन, समस्यांचे आकलन व्हावे या हेतूने 'महाराष्ट्रातील पुराभिलेखागाराचे सर्वंकष सर्वेक्षण उपार्जन, व्यवस्थापन, सेवा माहिती साधनांचे जतन व संवर्धनः एक चिकित्सक अभ्यास' हा विषय निवडला आहे.

संशोधन शीर्षक

'महाराष्ट्रातील पुराभिलेखागाराचे सर्वंकष सर्वेक्षण उपार्जन, व्यवस्थापन, सेवा माहिती साधनांचे जतन व संवर्धनः एक चिकित्सक अभ्यास'

संशोधनाच्या पद्धती

या विषयाचे संशोधन पूर्ण करण्याकरिता ऐतिहासिक संशोधन पद्धती, वर्णनात्मक संशोधन पद्धती व योग्य ठिकाणी निरीक्षण, प्रश्नावली तंत्राचा वापर करणार आहे.

संशोधन विषयाची साधनसामग्री

संशोधन प्रक्रियेमध्ये संशोधकाला संशोधन करताना अनेक साधनांचा वापर करावा लागतो. 'महाराष्ट्रातील पुराभिलेखागाराचे सर्वंकष सर्वेक्षण उपार्जन, व्यवस्थापन, सेवा माहिती साधनांचे जतन व संवर्धनः एक चिकित्सक अभ्यास' या विषयाचे प्रस्तुत संशोधन कार्य आधिक दर्जेदार होण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा उपयोग केला जाणार आहे. या साधनांमध्ये प्रामुख्याने हस्तलिखिते, डायरी, पोथी, नकाशे, वर्तमानपत्रे व नियतकालिके, मोडी अभिलेख, संस्थानिकांची कागदपत्रे, ताडपत्रे, भूर्जपत्रे, रूमाल, अभिलेख, मंत्रालय अभिलेख कक्ष, या संदर्भातील ग्रंथ, लेख आणि संशोधन साहित्य, खाजगी पत्रव्यवहार, निरनिराळे पत्रके, गझेटियर, साधने, प्रकाशित साधने, विशेषांक या बरोबरच प्राचीन काळातील लेखन साहित्य इत्यादीचा उपयोग केला जाणार आहे.

संशोधनाची उद्दीष्टे

१) पुराभिलेखागारमधील माहिती उपयोजक वापरतो का? याचा अभ्यास करणे.

२) पुराभिलेखागारमधील माहितीसंग्रहाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

३) पुराभिलेखागाराद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांच्या स्वरुपाची पाहणी व सेवांचा अभ्यास करणे.

४) पुराभिलेखागारामधील आधुनिक व्यवस्थापन तंत्राची पाहणी करणे.

५) पुराभिलेखागाराद्वारे दिल्या जाणाऱ्या माहिती डिजीटायझेशनचा आढावा घेणे.

६) ग्रंथालय आणि पुराभिलेखागार याच्या कार्याचा अभ्यास करणे.

७) पुराभिलेखागारमधील माहितीसंग्रहाच्या संदर्भ मागणीचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहितके

१) पुराभिलेखागारमधील माहितीसंग्रहाची काळजी घेतली जाते.

२) पुराभिलेखागारमधील माहितीसाठी येणाऱ्या उपयोजकाला योग्य ती सेवा मिळते.

३) पुराभिलेखागारमधील माहितीचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान वापरले जाते.

४) पुराभिलेखागारमधील माहितीसंग्रहाचा वापर संशोधक करताना दिसतात.

५) पुराभिलेखागारमधील माहितीसंग्रहाचे डिजीटीयझेशन करतात.

६) पुराभिलेखागारमधील माहितीमुळे संशोधकाला माहिती उपलब्ध होते.

संशोधन व्याप्ती व मर्यादा

संशोधनाची व्याप्ती ही महाराष्ट्र राज्यापुरती असून महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेखांचा अभ्यास ही संशोधनाची मर्यादा आहे.

प्रकरणाची मांडणी

प्रस्तुत संशोधनातील प्रकरणांची मांडणी पुढील प्रमाणे करण्यात येणार आहे.

१) प्रस्तावना

२) संबंधित साहित्याचा आढावा

३) पुराभिलेख/अभिलेखागार : ऐतिहासिक पार्श्वभूमी व विवेचन

४) माहितीचे सादरीकरण आणि विश्लेषण

५) निष्कर्ष, शोध व शिफारशी

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात ग्रंथालय आणि संशोधन या विषयाचे स्वरूप स्पष्ट करण्यात येईल. संशोधनाचे स्वरूप, व्याप्ती, मर्यादा, विषयाचे महत्त्व, गरज, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची

गृहितके, संशोधन पद्धतीची माहिती, माहिती संकलनाची साधने विश्लेषणाची तंत्रे प्राथमिक व दुय्यम साधने इत्यादीचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण दुसरे - संबंधित साहित्याचा आढावा

या प्रकरणात संशोधन विषयाच्या अनुषंगाने पूर्व संशोधनाची पाहणी करून संबंधित साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे - अभिलेखागार : ऐतिहासिक पार्श्वभूमी व विवेचन

सदर प्रकरणात अभिलेखागार, अभिलेखाचे सामान्य वर्गीकरण, अभिलेखाची संकल्पना, स्वरूप, वैशिष्ट्ये, अभिलेखाचे व्यवस्थापन जागतिक अभिलेखाचे, भारतीय अभिलेखाचे आणि महाराष्ट्रातील अभिलेखागार निर्मितीमागची कारणे व पार्श्वभूमीचा विचार या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे - माहितीचे सादरीकरण आणि विश्लेषण

माहितीच्या संकलनाची पध्दत आणि विश्लेषण कोणत्या पध्दतीने केले आहे.याची माहिती सदर प्रकरणात येणार आहे. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे विषयाचे सादरीकरण आणि विश्लेषण संख्यात्मक व गुणात्मक वर्गीकरण सारणी व आलेखाद्वारे करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे - निष्कर्ष, शिफारशी आणि निरीक्षणे

या प्रकरणात प्रस्तुत संशोधन विषयाची सारांश रूपाने मांडणी करून संशोधनाच्या आधारे निष्कर्ष व शिफारशींची मांडणी केली जाईल.

प्रस्तावित कार्य योजना

अ.क्र	कामाचे स्वरूप	कालावधी
१	पुर्व साहित्याचा आढावा घेणे	८ महिने
२	माहिती मिळविणे	८ महिने
३	माहितीचे संकलन आणि विश्लेषण करणे	८ महिने
४	प्रबंध लेखन	६ महिने
५	प्रबंध प्रस्तुतीकरण	६ महिने

संदर्भसूची

१) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन, डॉ. राजेंद्र कुंभार, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे, २०१३

२) कलावस्तु आणि ग्रंथालय साहित्याचे जतन, अगरवाल ओ. पी. नशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, दिल्ली.

३) Report of the Baroda University Commission, 1927 (In two paro). Published by authority of Baroda State, The Times Press, Bombay.

४) https://maharashtra-archives.org

५) पुरातत्वविद्या, वस्तुसंग्रहालयशास्त्र आणि पर्यटन, कठारे अनिल व साखरे विजया, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

६) संशोधन पद्धती, डॉ. पाटील वा. भा., प्रशांत पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती,२००६.

७) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती, निकोसे सत्यप्रकाश, प्रज्ञा प्रकाशन, नागपूर, २००७.

८) सामाजिक संशोधन पद्धती, कऱ्हाडे पी. एम., पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, २००७.

९) सार्वजनिक ग्रंथालये, यं. चं. म. मु. वि. नाशिक.

१०) संशोधन व्याख्या आणि पद्धती, यं. चं. म. मु. वि. नाशिक.

११)पुराभिलेख विद्या, शोभना गोखले, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे.

१२) महाराष्ट्रातील दप्तरखाने (वर्णन आणि तंत्र), वि. गो. खोबरेकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,१९८८.

१३) पुरातत्वविद्या, म. के. ढवळीकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८८.

१४) महाराष्ट्रातील पुरातत्व, संपा. हसमुख धिरजलाल सांकलिया व मधुकर श्रीपाद माटे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६.

संशोधक	मार्गदर्शक
व्यंकट बाबूराव सूर्यवंशी	डॉ. नामदेव रामकिशन काटे